मध्ये त्यांना जुना समाज तसाच्या तसा अंमलांत आणायचा होता, ब्राह्मणी राज्य पुन्हा स्थापायचें होतें असें नव्हे. ह्या जुन्या पद्धतीमध्ये व संस्कृतीमध्ये जें एक अमर, सनातन, विधायक, सृजक तत्त्व आहे तें कायम राहावें, त्याची पुन्हा प्रतिष्ठापना व्हावी हा त्यांचा प्रयत्न होता. जोंपर्यंत समाजांतील बहुसंख्य लोक अज्ञानांत, दारिद्र्यांत पिचत होते तोंपर्यंत त्यांच्या सुखदु:खांना कोणीतरी वाचा फोडणें अवश्य होतें. पुनरुज्जीवनाच्या मार्गांनी हें करून त्यांना इष्ट गोष्टी शिकवणेंहि कांही मर्यादेपर्यंत शक्य झालें. परंतु हें पुनरुज्जीवनाचें साधन फार जपून वापरावें लागतें. नाही तर कालांतरानें त्याचें लोढणें बनतें. स्वत:ला राजकारणाच्या गाड्याला जुंपून घेतल्यानंतर समाजसुधारणेला अग्रहक्क देणें टिळकांना शक्य नव्हतें. परंतु राजकारणाला अग्रहक्क देतांना त्यांनी सुधारणावाद्यांची केलेली निर्भर्त्सना फार कठोर झाली व त्यामुळे सुधारणेचें पाऊल अडखळलें असें म्हणावें लागतें.

सामाजिक बाबतींत हें नरमाईचें धोरण महाराष्ट्रांतल्या विशिष्ट परिस्थितीमुळे निर्माण झालें होतें. काल मावळलेल्या पेशवाईची स्मृति अजून ताजी होती. पुढारलेल्या वर्गाला, वरिष्ठ जातींना गेलेला अभिमान व प्रतिष्ठा परत मिळविण्याचा मार्ग म्हणजे राजकीय समता प्रस्थापित करणें हा होता. म्हणून महाराष्ट्रांत वरिष्ठ जातींचा राजकीय पुरोगामीपणा सामाजिक परागतीच्या – निदान त्याबाबतींत नरमाईच्या – हातांत हात घालून आला. महाराष्ट्रांत उदारमतवादाचीं मुळें बंगालमध्ये रुजलीं तशीं रुजलीं नाहीत. प्रार्थनासमाजाने अथवा आर्यसमाजासारख्या चळवळींनी महाराष्ट्रांत मूळ धरलें नाही. सत्यशोधक समाजाची सामाजिक समतेची मागणी त्यामुळे टिळक व त्यांचे अनुयायी यांना कधीच फारशी आकलन झाली नाही. जशी सत्यशोधकी पुढाऱ्यांना राजकीय समतेची मातब्बरी फारशी कळली नाही.

नायक कितीहि धीरोदात्त असला तरी त्याला सर्व आघाड्यांवर एकाच वेळीं लढतां येणार नाही हें खरें आहे. पण एका



## नरसिंह

'स्वयंसिद्ध स्वातंत्र्य हा हक्क माझाच' सह्याद्रिचा सिंह हुंकारिता।
दाढेंतुनी ओढुनी श्वास घेऊंच स्तंभांतुनी 'केसरी' गर्जता॥
नवें हिंदवी राष्ट्र स्वातंत्र्य घ्याया अनेकाधिका साधनें योजितां।
केला तुवां थंड हा लाल गोळा असंतोष चैतन्य दे भारता ॥ १ ॥

गणाधीश विघ्नेश तो बुद्धिदाता समाजांत वक्तृत्व देई धडे।
करी वंदना हिंद स्वातंत्र्यसूर्या शिवाजीच आदर्श डोळ्यापुढें॥
दिला आसरा क्रांतिवीरा, तयांच्या चितेंतून ही जागवी अस्मिता।
उठा सज्ज व्हा शस्त्र अस्त्रें करीं घ्या, रहस्येंच हे मंत्र गीतामृता ॥ २ ॥

महाधूर्त या मंदरेते* रचावी दुहीद्वंद्व खेळावया सूरत।
उभा ठाकला बाळ हा सिंह-छावा, करी योजनेचीच बेसूरत॥
'सुराज्यें शमे ना तृषा ही प्रजेची' स्वराज्याविना गर्जतो निर्भया।
असामान्य हा राष्ट्रद्रष्टा; गणिती नि लोकाग्रणी हिंद राष्ट्रास या ॥ ३ ॥

चतु:सूत्रिची मंत्रणा यंत्रणा ती, भिने हिंददेशांतरी प्रेरिता।
बहिष्कार, धिक्कार, वस्त्रादिकांच्या विदेशी तशा पेटवाव्या चिता॥
जितें आणिला प्लेग, दोषी तसे रोग, देशांत सैतान हा संचरें।
पराधीनता हीन निर्दाळितां, द्वेषविद्वेष तोही न दोषी ठरे ॥ ४ ॥

अन्याय हा न्याय, मानीत मी ना नमी, या तमीं लेउनी लांछन।
बळी घेत हें दुर्बलांचे छळानें, असें घातकी राजसिंहासन॥
हिरण्यां हरी या अशा कश्यपूतें धरी घेत मांडीवरी आडवा।
पोटांतलें पाप काढी नखें ती कृती विकृतीच्या विदारोत्सवा ॥ ५ ॥

तुवां चाखवीली चवी अमृताची, उरीं चेतवायास हिंदीजन।
बंदींतही घालतां लोकनेता, जितांतेहि केलेस बंदीजन॥
तुला वंदितो लोकमान्या सुधन्या, शुचिर्भूत हो आज माझी मती।
शिवाजी जसा वीर गाजी, कुणी ना तुझ्यासारखा जन्मला भारतीं ॥६॥

* मंदरेते – मॉडरेट्स

– राजा बढे

हागलागीन आवाजात पृच्छा केली, कोण गाडाव चढाया लागलंल्या ? शिडी ?"

कांबळे गुरुजी कावरे बावरे झालं. आवाज तर अंजरहोंचा वाटत होता. घाई-घाईनं शेवटच्या दोन पायऱ्या चढून कांबळे गुरुजींनी स्टेजवर आपली हनु-वटी टेकविली अन् म्हटलं." मी नव्हे क पाटील ! कांबळे गुरुजी !"

तुम्ही हायसा का ? मंग बराबर ! शिडी आवाज करनारच !" पाटील म्हणाले अन् तिथं असलंले पाटलाचे सवंगडी मोठ्यांदा हसले.

'कापरे गुर्जी," पाटील पुढं म्हणाले, "म्हांरहून तुमी गुर्जींसी हात दंवा. नाच-तर तंनाला चढाया यायाचं न्हाई !"

"छे ! छं ! नको पाटील." कांबळे गुरुजी म्हणाले, "माला यंतंय चढता. मी प्रॅक्टिस केलीय त्याची."

अन् खरंच कांबळे गुरुजी सफाईनं स्टेजवर आले. शाळेच्या इमारतीजवळचा एक विजेचा खांब होता. खांबावरील विजेच्या दिव्याच्या मंद प्रकाशात पाटील, सरपंच आणि कंपनीचा पत्त्यांचा डाव चालला होता. जोडीला बाटल्या आणि कप होते.

"गंगे," पाटील आपल्या शेजारी बस-लेल्या बाईला म्हणाले, "थांबलीस का ? तीर्थाची आनखी एक फेरी हू दं ! कांबळे गुरुजी परथमच आल्यात. त्यासनीबी दे."

"नको पाटीसाहेब नको ! मी आजवर कधी घेतली नाही." कांबळे गुरुजी हात जोडून म्हणाले.

"आवं गुर्जी कंदि घेतली नाच म्हून तं आजला घ्यायाची !" सरपंच जड झालेल्या जीभेनं म्हणाले, "कापरे गुर्जींनी परथम शितं आलं तवा असं म्हनला व्हतं. पर आता पघा करा पारीसाध्ध हैत गावात ? हां ! आता असं म्हना गंगूनं धिलेलं तीरथ तुमास्नी चालत नसंल तं आमची रंगू हाय ! रंगं, ऱ्हो म्होरं."

रंगू सरपंचाजवळून उठली तसे कांबळे गुरुजी अगदी हवालदिल झाले.

"नको हो सरपंच साहेब !" सरपंचा समोर साष्टांग लोटांगण घालीत कांबळे गुरुजी म्हणाले, "माझ्यावर दया करा. मी परत जातो. तुम्हा मंडळींचा रस-भंग केला त्याबद्दल गरीबाला क्षमा करा

"गुर्जी !" पाटील म्हणाले, "तुमी बेफिकर न्हावा. ह्यां ज्यंच्या त्यंच्या खुषीचा पश्न हाय. आमी तुमास्नी सक्ती कर-नार नाय."

# टंकलेखिका [Typist Girl]

[illegible] 'अराजक' आपसात यादवी
नवयौवन सौंदर्याची, ती मादक मधुमाधवी
सिंव्हासन राहि न रिते, सावजे नवी
जरि पदच्यूत हो राजा, ती प्रधानास आर्जवी
नाचरी भिंगरी फिरे, नेत्र बावरे
कमनीय लचक कमरेची, गिर्कीत घोळ बिस्तरे
ओठात गोड जांभळी लूट कोवळी
गालात लाजरी लाली झेलिता पडावी खळी
'मी तुझीच' कोणासही सहज भासवी
नाचवी रंगली बोटे अन् बोटावर नाचवी
नरसिंव्हहि ती नखलिताच मंदोदरी
की छुपी छुरिका पाती–ती नखे रक्तिमावरी
भरदार दिसे पोटरी डौल गोजिरा
चालते मंद मदमाती ती नितंबिनी वागुरा
रेखीव रंगसंगती संगमोत्सुका
'की बोर्ड' जाणते सारा 'टचमेथड' तिज ठाऊका
टपटपा टिपाया टपे अंकटंकिका
झेलते शब्द ओठांचे निष्णात टंकलेखिका
गतिशील कामगामिनी कायि गुंगली
अर्धांग्ल अंगरागाने नखशिखान्त ती रंगली
ती विरल वेष भूषिता 'स्कर्ट' धारिणी
चालते उंच टाचेने मदमस्त मत्त वारिणी
टाचते कागदासवे चित्त टाचणी
टोचून देह मंदेहा, मारिते टाच पापणी
उघडीत जंवि 'केबीन' 'स्वयं फाइल'
बाईल नसे तरि देई सहवासहि 'मोबाइल
साधते कार सहकार सहज सहचरी
सांगता येत सहलीला, ती मुके न संधी तरी
खाजगी कार्यवाहिनी, चतुर भाषिणी
अप्सरा कचेरी माजी, प्रमुखांची मनमोहिनी
तो 'बाघ' जरी इतरास 'मेष' तिजपुढे
ते मेषपात्र ही नेमे, तरि 'बॉस' म्हणुनि आवडे
टाकिते अर्ज नजराणे भिर्कावुनी
आर्जवीच कारकूनांची ही कचेरीय कामिनी

☆ राजा बढे

लोकमत - दिवाळी अंक
१९७५

साप्ताहिक तरुणभारत - २१-५-००



# मृत्युंजय सावरकर

पुढे दाट अंधार या काजव्यांच्या जरी मागुती तेज कोंदाटले
मनीं चांदणे धातकी चोरट्यांच्या, अहंकार आभाळ तें फाटलें
धराभीतरीं धूर्त हे पेटवीती उजेडास आतंक दावानल
कोल्हेकुईनेंच कीं वाढवीती अहिंसाव्रती राष्ट्रसेनाबल. ॥१॥

निशाधुंद अस्मान सुलतान हा चांद सत्तामदें कीं पुरा मातला
छळाया प्रजा मानवी काळराती भुतांचा जमे सर्व गोतावळा
करें कष्टवी, भ्रष्टवी, धर्मनीती, कलंकास ये वाढतें वैभव
झांकावया कृष्ण कृत्यें न भीती, वरी शांततेचे कलाकैतव ॥२॥

शांतिप्रपातें नरू गारठावे. अहिंसाविवर्तें झडे पालवी
दिशाभूल हो सत्य धूली कणांनी. काळोख तेजोरवी मालवी
अस्मान झेलावया टांगली ही दिवाभीत कीं वाघुळांची पिलें
निस्तेज कोमेजल्या वल्लरींना फुलावी कशी पौरुषाची फुलें ॥३॥

सह्याद्रिच्या राजसिंव्हा जिनादे तुझी गर्जना कोटि कंठांतुनी.
फोडावया मत्त गंडस्थळातें, किती वीर छावे निघाले रणीं
विस्फारिले निश्चयें नेत्र कोटी नि प्रस्फुरिल्या कोटि कोटी भुजा
संहारण्या हिंदुविध्वंसिनी शक्ति, रक्षावया हिंदराष्ट्रध्वजा ॥४॥

तुझें श्रेय घ्याया धजे शौर्य खोटें, रचाया तुझ्या संचिताची चिता
चिता भस्म चर्चून भूतेंच भाली विभूतीच या भासती भारता
सह्याद्रिच्या वीर स्वातंत्र्यसिंव्हा तुझी झेप कालावरी निर्भया
मृत्यूवरी मात केलीस धीरा, तया जिंकिलें तूंच मृत्युंजया ॥५॥

-x-

राजा बढे

श्री. राजा बढे यांची ही कविता त्यांच्या नागपुरातील मुक्कामात आमचे सहकारी श्री. दा. त्र्यं सबनीस यांनी 'तरुण भारत' करिता प्राप्त करून घतली. श्री. राजा बढे यांच्या काव्यप्रतिभप्रमाणच त्यांच्या सुंदर हस्ताक्षराचाहि वाचकांना परिचय व्हावा या उद्देशाने त्यांच्या हस्ताक्षरातच तो कविता त्यांच्या स्वाक्षरीनिशी जशीच्या तशी वर दिलेली आहे.

# हिंदु-हृदय

प्रभावशालि वाक्पटुत्व वाहवी प्रवाहिता
मनोज्ञ तर्कसंगती, स्वयंप्रभा विवादिता
हिंदुराष्ट्र संस्कृती अखंड ध्येयनिष्ठता
भारती मनांमनांत चेतवीत अस्मिता

लौकिकात थोर तू, तरी अजून पोर तू
स्वकीय मित्र परिजनास लाविलास घोर तू
गुणज्ञ शास्त्र पंडितांत जाहला महान तू
अजून बाळ प्रेमळा तसाच रे लहान तूं

तोच हट्ट, तीच रीत, तीच प्रीत, तो लळा
तेच बंध, तेच छंद, हर्ष खेद मोकळा
घातकीच दुष्ट दैव काय दृष्ट बाधली?
खेळ सोडुनी तसाच का अवेळ साधली

नियोजिले नि कल्पिले, सुरम्य स्वप्न पाहिले
किती तरी लिहायचेहि ते तसेच राहिले
जाहले पुरे न ग्रंथ घाइ काय ही तुला
वाचणेहि राहिले मधेच ग्रंथ संपला

*

देहवसान सोडुनिया, वागीश्वर हा जाता
गहिवरले जनमानस, सहधर्मी प्रियकान्ता
कंपित हो वीणारव, आर्तमन दुभंगले
भारतीय ‘ हिंदुहृदय ’ हाय आज भंगले !

—राजा बढे



# 'हा नसे जित पहा'

मंत्रिले जयानें क्रांतीचें ब्रम्हास्त्र
सावरीत शस्त्रें जये शिकविले शास्त्र
की गर्जेंद्रशुंडेनेच जया उपटावें
अरविंद क्रांतिचें मनामनांत फुलावे
अन् अभिनव भारत उठले घेउनि आण
बुद्धघाव घ्यावया करी सतीचें वाण
मादात घे गदा विदारण्यातें हाती
दु:शासन आसन डळमळले आघाती
'ने मजसि सागरा परत मातृभूमीला
रे भेटीसाठी प्राण सख्या तळमळला'
ती ज्योत क्रांतिची तरंगली सिंधूत
अन् किरणशलाका भरे बिंदुबिंदूत
तें अंदमानचे होई पावन क्षत्र
थाशंने बघती जिकडे भारतनेत्र
इहलोकी अमृत आणियलें वीरांनी
किति अमर जाहले पिउनी काळ पाणी
निर्वंश वंश जो झाला देशाकरता
विसरलो विनायक सायक तो लखलखता
ओविली ज्योत ज्योतीत जीव जरतारी
पदरास गुंफिली सूडाची चिनगारी
यौवनांत फुलत्या गुंफियले ग झेले
कोवळ्या रक्तरंगांत रंगले शेले
ग भारतमाते तुझी राखण्या लाज
चढविला तुला हा हौतात्म्याचा साज
भ्रांतिची उडविता राळ विसरले गेले
स्वातंत्र्यसमर तें अमर जयांनीं केले
ती ज्योत क्रांतिची काळावरती नाचे
कापल्या जिभा तरि कशी बोलसी वाचे
छळ क्रूर पाहुनी भिती भिती रडल्या
त्या लोहशृंखला तुरुंगांत बडबडल्या
'हा नसे जित पहा, अबल न हा सेनानी'
परि घात तयाचा केला हो स्वजनांनीं
भारता धरावा नित गौरव अभिमान
उलटलेस काळां ते सोनेरी पान
झाकण्या तेज ते कितिही केले यत्न
हरपले आज ते खरेच भारतरत्न.

—राजा बढे, मुंबई

# अजून यौवनांत मी

— राजा बढे



## [ एका स्थविराची कैफियत ]

पुरे न कोणिही मला असून जीवनांत मी
न जून मी अजून मी अजून यौवनांत मी
राहिला न एकही केस माझिया शिरीं
येत पीके पांढरे अधेमधे कुठे तरी
लोटते पुढे पुढेच सारखें मला वय
मानिला न मी मुळीं जरे पुढे पराजय
खात ऊस फोडुनी अजून चावतो चणे
ओवितो सुईंत सूत हीन हीं न लोचनें
फोडण्यास लांकडें आजही समर्थ मी
कांहिही म्हणा कुणी अजून यौवनांत मी
ताठल्या शिराशिरा शरीर नीट बांधलें
ताठ पाठिचा कणा नि हाडपेर सांधले
भार वाहिला तरीहि वाकली न कंबर
खास कासवापरी जगेन वर्ष शंभर
प्रयोगिकेंत एकटाच चिंतनांत गुंग मी
'अलीगढी' सचित्र ग्रंथ वाचण्यांत दंग मी
विविध मासिके नि अंक न्याहळीत नेहमी
जाणतो पुरी दुरून प्रीतिची ' अनॉटमी '
सांगतो सभेस मी असातसा न आदमी
सैल धोतरें मुलाम, शर्ट गर्भ–रेशमी
अनंगरंग शास्त्रबद्ध सिद्ध प्रेमसंगमी
या युगांत वात्स्यायन मानतो स्वतःस मी
सेविता न मोदका, तसा जवानमर्द मी
फसवया रसातळी सवंग प्रीतकर्दमीं
इत्र इस्तमालुनी फिरे दिलेर दर्द मी
लखनवी नजाकतीत मी नसे मुळीं कमी
विभांडकाश्रमीं विरक्त मोहनिद्र शृंग मी
शकुंतले सभोंवती फिरे मरंद–भृंग मी
देवयानि परिणया ययातिया वयांत मी
कुभांड हें कुभांड हें कसा न यौवनांत मी

# भारतीय राज्यघटनेंतील मूलभूत हक्क

( पान ५ वरून )

जनतेवरहि आहे हें केव्हांही विसरून चालावयाचें नाहीं.

## काळा कायदा

उदाहरणच द्यावयाचें तर प्रतिबंधक स्थानबद्धतेच्या कायद्याचें देतां येईल. "कायद्यांतला काळा कायदा" असें याचें वर्णन करण्यांत येतें. आणि एका अर्थानें तें योग्यहि आहे. लोकशाहीला हा काळीमा आहे, व्यक्तिस्वातंत्र्याचा हा बळी आहे, अशी त्यावर टीका करण्यांत येते. आणि तरीही संसदेंतील तसेंच संसदेबाहेरील विरोधाला न जुमानतां सरकार या कायद्याची आयुर्मर्यादा पुन्हां पुन्हां वाढविते. सुधारलेल्या देशांत फक्त आणीबाणीच्या काळांत असा कायदा प्रसृत केला जातो. परंतु भारतीय राज्यघटनेंत शांततेच्या काळांतही त्याचें अस्तित्व विसंगत आहे. लोकशाहीच्या रूढ संकेतांशीं हें सर्वस्वी विसंगत आहे. आणि तरीही सर अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांच्यासारख्यांनीं या कायद्याचें समर्थन केलें आहे. ते म्हणतात, 'स्वातंत्र्याचे कट्टे पुरस्कर्तेहि हें कबूल करतील, कीं आज देशांत अशी कांहीं माणसें आहेत कीं ज्यांनीं घटना व देश दोन्हीही धुळीला मिळविण्याचा जणुं निश्चयच केला आहे; देशाची प्रगति व्हावयाची असेल आणि व्यक्तीचें जीवित आणि मालमत्ता सुरक्षित रहावयाची असेल तर असल्या समाजशत्रूंचा बंदोबस्त करण्यासाठीं सरकारला वरीलसारखा अधिकार असणें अपरिहार्य आहे.' हें समर्थन सर्वस्वी चुकीचें आहे असें म्हणतां येणार नाहीं. या कायद्याचा गैरवापर करून सरकार विरोधी पक्षांना नेस्तनाबुत करूं बघतें या विरोधकांच्या आरोपाबाबत मात्र सरकारजवळ समाधानकारक उत्तर नाहीं हें कबूल करावें लागतें. स्थानबद्धतेच्या कायद्यांतील खरें शल्य हें आहे.

## वाजवी निर्बंध

विशिष्ट परिस्थितींत राज्यघटना सरकारला मूलभूत हक्क नियंत्रित करण्याचा अधिकार देते याचा अर्थ घटना या हक्कांना सरसकट नकार देते असा करणें बरोबर होणार नाहीं. वास्तविक राज्यघटनेंत वैयक्तिक स्वातंत्र्य व सामाजिक स्वास्थ्य यांची तडजोड करण्यांत आली आहे. आणि हा प्रयत्न बव्हंशीं यशस्वीही झाला आहे. कोणतेही मूलभूत हक्क अनिर्बंध असे असूं शकत नाहींत. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नसेल तर स्वातंत्र्यावर योग्य तीं बंधनें असणें हें केव्हांही श्रेयस्करच होय. अधिकांचें अधिक हित बघण्याच्या दृष्टीनें असें करणें योग्य होय. त्यांतही मूलभूत हक्कांचा हा संकोच सरकारतर्फे होत नसून लोकप्रतिनिधींच्या कायदेमंडळांतर्फे तो करण्यांत येतो हें विसरतां कामा नये. घटनेनें यापुढें जाऊन असें स्पष्ट केलें आहे, कीं हक्कावरील नियंत्रणें 'वाजवी' असलीं पाहिजेत व तीं तशी असल्याची ग्वाही न्यायसंस्थेनें दिली पाहिजे. या संदर्भात न्या. छगला यांनीं काढलेले उद्गार मननीय आहेत. ते म्हणतात, "मूलभूत हक्कांवर अशा मर्यादा व असे निर्बंध घालणें म्हणजे एका हातानें हे हक्क देऊन दुसऱ्या हातानें ते हिरावून घेणें होय, ही माझ्या मतें उथळ टीका होय. हे निर्बंध व्यक्तिनिष्ठ असे आहेत व घटनेनें घालून दिलेल्या वस्तुनिष्ठ कसोट्यांना ते उतरतात हें पहाण्याची जबाबदारी न्यायसंस्थेची आहे." स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या बारा वर्षांच्या काळांत ही जबाबदारी न्यायसंस्थेनें उत्तम तऱ्हेनें पार पाडली आहे व मूलभूत हक्कांचें रक्षण डोळ्यांत तेल घालून केलें आहे याबद्दल कोठेंही दुमत नाहीं.

## घटनादुरुस्तीचे टीकाकार

घटना दुरुस्त्यासंबंधांतही पुष्कळदां अशाच तऱ्हेची अतिरेकी टीका केली जाते. "अमेरिकेंत अशा दुरुस्त्या मूलभूत हक्कांचा विस्तार करण्यासाठीं करण्यांत येतात, आपल्या- देशांत त्या वरील हक्कांचा संकोच करण्यासाठीं केल्या जात आहेत्" असा विरोधकांचा मुख्य दावा. या दुरुस्त्या संसदेंत विशेष प्रकारच्या मताधिक्यानें संमत व्हाव्या लागतात या युक्तिवादांत हंशील नाहीं. कारण केंद्रांत काय वा घटक

रहाणार नाहींत. समाजवादी समाजरचनेंत व्यक्तीपेक्षां समाज श्रेष्ठ हें ओळखून सामुदायिक हितासाठीं वैयक्तिक हक्कावर पाणी सोडावयाला सर्वांनीं आपखुशीनें तयार झालें पाहिजे. सर-

# प्रजासत्ताक भारत ?

अहो भाग्य हें आमुचें, खंडलेलें प्रजातंत्र स्वातंत्र्य ये भारतीं
ओवाळिती एकमेका फुकाच्या यशाची करीं घेउनी आरती
संभ्रांत या लोकशाहींत आतां सुखें माजवूं सावळागोंधळ
असे थोर दास्यत्व हें इंग्रजांचें, तसे देशभक्तीस आलें फळ

राखावयातें महत्ता अहंता मनःपूत ही चालली यंत्रणा
कुलाचे कुलांगार आमंत्रितांना मिठी घालते ही महामंत्रणा
मिळे वाव सत्तेस मत्ता कराया, अशोकास लत्ता, फुले विकृती
पुढें पाहतां देप ताडीगुळाचीच खादींतले डोंगळे धावती

सुटे तोंडचा घास, पाणी पळावें, पराशावरी पिंड हा पोसतो
महाभव्य हीं बांधकामें बघूनीच पोटावरी हातही घासतो
उधारींत नानाविधा धोरणांचीं अनिर्बंध ही बांधली तोरणें
शिव्यांच्या खुराकासवें दांत खातां उपाशी जनांचें फिटे पारणें

'खादी'स या कागदी योजनांची नवी पंचवार्षीक ये पर्वणी
गुणी गाढवा मेजवानी मिळावी उपाशी बिचारा घराचा धनी
बेटे बडे बापके राजकाजीं प्रतिष्ठेंत नांदेल वंशावळ
नाहीं कमी भारतीं अन्य कोणा, घरीं पाहुण्यांची सदा वर्दळ

येई घरीं आंग्लराणी सुवर्णा तिला रत्नखाणी करूं मोकळ्या
आहेर हा, ने हरूनी फुले ना फुलांच्याच लक्षावधी पाकळ्या
पिंजारुनीया मिशा कौतुकाच्या किती मांजरी श्वान ते चोंबडे
लाचार लांगूलचारी चुकारी, तुरेदार ते झांकले कोंबडे

शहाणे मदारींतले उंट येती तशा गौरकार्या किती बेगमा
आगे न मागे तरी काम भागे, न मागे तयाचीच दासी रमा

—कोंडबा


थोड्याशा सनलाइटनें
पुष्कळच कपडे धुवून निघतात

नागपूरच्या जुन्या पिढीतील सुविख्यात कवी श्री राजा बढे यांनी एका वयस्क नापिताची विलापिका लिहिलेली आहे. तीत काळानुसार एक दोन कडव्यांची भर त्यांनी घातली आहे. तेवीस कडव्यांच्या या विलापिकेतील ही तेरा निवडक कडवी.



# गेले गेले अहह सगळे चेहरे ओळखीचे

**● राजा बढे**

वे. शा. शास्त्री, चिवट भटजी, रावसाहेब कोणी
धर्मात्मे, वा कुलगुरु, महंतादि सर्वत्र प्राणी
पंडे, गुंडे, विबुधजन अध्वर्यु पूर्वीपिढीचे
गेले गेले अहह सगळे चेहरे ओळखीचे ॥ १ ॥

येती कोणी सुबक निटिली कोर कापावयाला
डोक्यातें वा नविन जिल्हई आपुल्या दावयाला
एखादाच्या नुसतिच उभ्या शेंडिची गाठ सोडा
गायीच्या कीं मुरुचिर खुराएवढा वा चनोडा ॥ २॥

तैलासिक्ता तकतकित ही लोंबते लांब चोटी
सूर्याच्या ती प्रखर करतापें तपे गारगोटी
पाही जेव्हां सहज कधि मी हस्तकौशल्य माझें
आनंदाश्रू उभयनयनीं हर्ष चित्तीं विराजे ॥३ ॥

मोठे मोठे झुकविति पुढें आपुल्या ताठ माना
कित्येकांचा मद उतरला पीळ देतां मिशांना
हातामाजी असति सगळ्या लांब आखूड शेंड्या
हूं कीं चू ही करिति न कधीं त्यास देतां गचांड्या ॥४॥

कित्येकांच्या अजबरि पहा जेवलो बारशाला
घेवोनीया डफ तुणतुणें घातले गोंधळाला
जेव्हां केव्हां मिरवण निघे येत हाती मशाल
तेलाची अन् धरुनि बुदली ओतिली ती खुशाल ॥५॥

मोठे मोठे जरठ करिती 'बाल संगोपनातें'
एकांताच्या तरुण कथिती चोरट्या गोपनातें
माझ्यापाशीं उघड करणें अंगप्रत्यंग सारे
थोरांचीही 'कलपगुपिते'' जाणतो मी नसा रे ॥ ६ ॥

खांद्याशी ही लगटुनि बसे मत्सखी धोपटी ही
कंठीं माझ्या कर निशिदिनीं कां निराशा तरी ही
सांगाना हो पुरविन कसे कोड या बापडीचे
'गेले गेले अहह सगळे चेहरे ओळखीचे ॥ ७ ॥

धंद्याची ही बघुनि विपदा चित्त जाई उलून
चाली रीति त्यजुनि असलें काढणे का 'सलून'
रंध्रारंध्रामधुनि भरला पूर्ण धर्माभिमान
येवो मातें मरण तरि मी वाकवी ही न मान ॥ ८ ॥

ठेवी ना ते विपुल कचसंभार बिंबाधराला
थोडा कोठें वर उगवता मारणे अंकुराला
गालीं ओठीं मुळि न धरि तो खुंट वैकुंठवासी
देवा कां रे कलियुगि युवा तूंच आदर्श होसी ॥ ९ ॥

आतां सारे मिरविति जटाजूट कीं धूर्जटीचा
झाले हिप्पी सकल, फिरला काळ आला तुटीचा
कल्ले गाली झुलति झुलुपे त्या मिशा गल्लमुच्छे
केसांना कीं उलट फुटले मानवी बालबच्चे ॥ १० ॥

येती कोणी मिळवुनि मतें 'म्यूनिसीपालटीत'
न्याहाळाया दिसति कुणी का बोडखे खाजवीत
प्रश्नातें वा बगल कुणि देतांच कैंचीत घ्यावें
जेथें तेथें कुलविभव हें आपुलें दाखवावे ॥ ११ ॥

न्हाव्याचा का त्यजुनि असला हा पिढीजाद धंदा
साहित्याच्या भरिस पडुनी का कराव्यात निंदा
ईर्षेनें वा झटुनि करणें लोककल्याण भारी
गांधीटोपी वरुनि बनणे स्वार्थसाधू पुढारी ॥ १२ ॥



नाहीं कोणी कुशल पुसण्या, बोलण्या चालण्याही
पूर्वी जेथें गजबज सदा शून्य ते सर्व कांहीं
केसांनी हा फसवुनि असे कां गळा कापिता रे
'गेले सारे जिवलग नसे या आता नापिता रे ॥ १३ ॥



तरुण भारत, नागपूर

# रुतले नसते जरि तीर उरीं — !

रुतले नसते जरि तीर उरी मनिं घाव असे सलले नसते ।
कळलें नसतें जग हें मजला जरि जीवित हे जळलें नसते ॥
भोगांत सरे सुखरात जरी भोगाविण जळते दीपकळी ।
पंखांत पतगांच्या जळल्या, तें प्रेम मला कळलें नसतें ॥
अडलें असतें वळणावरती जरि पाउल हें चुकलें नसतें ।
घडती न कधीं मग भेट तुझी जरि वाट अशी भुललें नसतें ॥
कपटी करपाश करून तुझे जरि मोहुनि मी फसलें नसतें ।
प्यालें नसते जरि अश्रुभरी नवयौवन हें फुललें नसतें ॥
विरलें असतें ममतेंत जरी, हें विश्व मला पुरलें नसते ।
पुरतेपण पांघरता पुरते, परकेपण हें उरलें नसतें ॥
सुटला नसता जरि तोल असा, जरिं वादळही भरलें नसतें ।
कळली नसती जरि नाव जलीं, तव नाव प्रभो स्मरलें नसतें ॥
बसला नच नागिणिचा विळखा जहरी लहरी सुखदंश असे ।
दुखवीत सदैवच दैव असे खदखदुनि मला हसलें नसतें ॥

— राजा बढे

# दुरावलेले बुलबुल

( फुलांसाठीं बुलबुल जगतात व बुलबुलासाठीं फुलें फुलतात असा अेक संकेत आहे. राजद्वारी बरेच बुलबुलांचे पिंजरे टांगलेले आहेत. त्या बुलबुलांनी आपला बाळपणीचा काळ जिथें घालविला ती बाग कुठेतरी दूरवर भस्मसात होत आहे. बागेच्या दिशेकडे आतुरल्या नजरेनें पहात तिकडील कांहीं हालचाल कळेल या आशेवरच ते जगत होते व असा अेक सौभाग्यदिन अुगवला. त्यांना कुणीतरी सांगितलं कीं, आपल्या बागेत वसंत फुलणार आहे. बहार येणार आहे. ही आनंददायक वार्ता अैकून पंजरस्थ जिवांची होणारी तळमळ व भारताला स्वातंत्र्य मिळूनही आपल्या मातृभूमीला व स्वातंत्र्य लाभाला मुकलेले निर्वासित व अितरत्र असणारे, तथाकथित पुष्कळ गुन्हेगार यांच्याही हृदयांची तळमळ — ही सारखीच नव्हे काय ? )

बंदिस्त जिवांची किलबिल क्षण थांबली
वाहतो पवन का असा चोर पावली
होणार काय तरि आज अुपवनांतरीं
म्हणतात येतसे बहार अपुल्या घरीं ॥

तो दूत फुलांचा आला मधु सौरभ
संदेश सांगतो सकला सुख दुर्लभ
आतूर पाखरा अैक हृदय दाबुनी
येणार बहर रे अुद्या तुझ्या काननीं ॥

भिरभिरा पाहती बंदिवान पाखरें
ती शोभा नयनीं रक्ताश्रूचे झरे
मनहंस सारखा फडफड फडफड करीं
येणार बहर लाडका आपुल्या घरीं ॥

परतंत्र पाखरें पंजरांत कोंडलीं
बागेंत तयाच्या धूळधाण चालली
रडवाया येअी समीर दूतापरी
हासून सांगतो बहार आली घरीं ॥

बाहेर बहरली बाग आग अंतरीं
जळति हृदय ओततोच अश्रू सरी
तळमळ ! बहरल्या नटली ती वाटिका
जिवनीवा शोकान्तिका नवी नाटिका ॥

बघ मिटून डोळे लुटलेलें वैभव
अन् घुमव सारखा दिगंत तो स्तुतिरव
" कीं बहार आली बहार आली नवी "
त्या साम्राज्यावर बिझेल कैसा रवी ? ॥

मोडशील कैसा चोचीनें ते गज
धरतात सुटाया का वेड्या सावज ?
फटफडदि पंख तो पुन्हां अुडाया वरी
आदळला खालीं हताश धडधड अुरीं ॥

कधि पाहीन डोळा भरून माझें जग
स्वच्छंद भरारी घेअुनि लंघिन नग
ठायींच तळमळे हाय बिचारा खग
अन् बहार आली तिथें होय तगमग ॥

———::ooo::———



# डाव्या डोळ्यानं लुटलं सारं शहर !

**राजा बढे**

झुले नाजुक नवतीचा हिरवा बहर
अंगमोडीत उठली फुटती लहर
महिरला देह ग नागिण लपेट
केवडयाच्या बनाची ही लावण्यपेठ
नजरेच्या निळाईत भरलं जहर— ॥ १ ॥

पायीं पैंजण घुमवीत आली उषा
किलबिलती कोनीं दाही दिशा—
पहाटेचा झुंजुमुंजु पहिला प्रहर— ॥ २ ॥

खेळीमेळी कशी खुली केलीस वेस
तुझे अजाण सौंदर्य पडे इरेस
हिरव्यासाडीत मिरवी झुलती लहर ॥ ३ ॥

काळजाची पायघडी केलीस ग
मन कुठं ग ठेवलं ओलीस ग
तुझ्या जुलुमानं बाई केला कहर ॥ ४ ॥

करि घायाळ जीवा निसटती नजर
लाजेच्या धिटाईत नाहीं उजर
डाव्या डोळ्यानं लुटलं शहर ॥ ५ ॥

# बालगंधर्व अभिवंदना.

— पद्मभूषण राजहंस —

१

सप्तदश पंच शरद् रातीं
निरांजन चंद्रकला हातीं
उजळत्या लक्ष स्नेहज्योती
आरती करिते गुणप्रीती.
बहुभरी अभिवंदन लाटा
पूजिती तुज नटसम्राटा
पाहतां विभव देव दृष्टी
उत्सवीं करी सुधावृष्टी
तव गान
पुरविते भान
धरी अभिमान
रंगभूजाण सर्वकाळीं
स्तुति स्मृती नित चवऱ्या ढाळी

२.

गीत संगीत विविध अंगें
अभिजयें नवें नाट्य रंगे
शोक, कारुण्य प्रणय हर्ष
नवरसीं रमे राजहंस
मानसी सरस भावनांचे
करिता रंजन रसिकांचे
भरविती घास कौतुकाचे
शिंपले अश्रु मोतियांचे
जन मान्य
कुणी ना अन्य
पाजिले स्तन्या
मानिते धन्य भावभोळी
मराठी माय मायबोली

३

माधवी लोलेत मंजुबोल
लयींचा आगळाच डौल
आर्जवी गोड शब्दसोस
रसांचे मधुर द्राक्षघोस
सहजता तानवल्लरींची
स्वरांची खेच आर्ततेची
गाइला तुवां नाट्यवेद
घेतसे हृदयाचा वेध
मधु पर्व
गुंफी गंधर्व
आयुचा गर्व
गायनीं नाटलीस लेणें
रुजले घरोघरीं गाणें

४

रंग रस रूप त्रिगुणमूर्ती
वाढती सदाच यशकीर्ति
जन्मले कितीक निपुण महा
'कलानारायण' या सम हा
पूर्वते अपूर्वता ल्याली
प्रतीची, येत अंशुमाली
सुभद्रा, सुता देवयानी
द्रौपदी, सीता अभिमानी
रुक्मिणी,
रेवती गुणी
सिंधु, भामिनी
मेनका, शकुंतला पाही
शारदा अमर अभिनयाही

# साकी—[ द्राक्षकन्या ]

( गझल )

' उभी धुंद मस्तींत कां द्राक्षकन्ये '
मिजाशींत जाशी मला चाळवाया
अनंगावरी अंगने मात केली
मनें मोडिती अंगमोड्या तुझ्या या
मुळीं ताल नाहीं तुझ्या खेळण्याला
झुले स्वर्ग पाताळ तालावरी या
प्रीतीमुळें पाजळे दीप आधीं
पतंगास कां लावणें बोल वाया
गडे गुंतवीतो तुझे प्रेमतंतू
तुझ्यावीण ही वीण कैसी सुटाया
जरा लाजुनी देत झोकांत झोका
कशी हालते कोवळी क्लांत काया
कपोलावरी सोडिली जोडवेणी
नव्हे नागिणी केवडा रक्षिण्या या
अशी मांडली लूट कां यौवनाची
खुली झांकता मूठ लक्षांत याया
नको वारुणी कांच पात्रांतली ही
हवें पात्र हें चुंबनानें भराया
जपूनी सखे ठेव या दर्पणाला
न लागेल वेळा तयाला फुटाया
नको दृष्टितूनी मला दूर फेंकूं
सुखें फेक दृष्टि अभाग्यावरी या
उसासे तुझे मंद, आंदोलनांनी
चिरंजीव ही वांछितो गे मराया

राजा बढे, नागपूर

# थांब रे पथिका जरा—

थांब रे पथिका जरा जा ऐकुनी माझी कथा
नीट घे पाहोनिया नांवाजल्या प्रीतीपथा
वांकडी वळणेंच हीं कळणें कशीं कोणासही
वाट ही चुकली तुझी मुरडून मागें पाहतां
दिसति तुज वाटेवरी या उमटलीं हीं पाउलें
चुरलीं किति पायांतलीं हृदयें तयानें, चालतां
काजळांतुनि वाहिलीं गुपितेंच कीं गालावरी
पुसलीं न कोणी आंसवें, कोणा न कळली रे व्यथा
उरलि ना रसमाधुरी गळल्या पहा रे पाकळ्या
या पुन्हां सुकल्या फुला येईल कां हो हांसतां ?
यौवना कां पाडिसी रे मोहजालीं जीवना !
मोडिलें मन हें रथाखालीं तुझ्या रे मन्मथा

—राजा बढे



# शिवमंगल (स्तोत्र)

**दख्खनच्या हे प्रतापसूर्या**
**जय जय जय शिवराया**

मायभूमिच्या महन्मंगला, महाराष्ट्राच्या कलिजा
रायगडाच्या राजा देवा सह्याद्रीच्या सरजा
शिवनेरीच्या शिवा जिवाची कुरवंडी तव पाया
जय जय जय शिवराया ॥ १ ॥

दिशांदिशांतुनि आज तुझ्यावर तेजाची झिरपणी
नभोदुंदुभी झडती आली ही मंगल पर्वणी
तरंग गाती पूरुषसूक्त हे, लोळण घेई दर्या
जय जय जय शिवराया ॥ २ ॥

हृदयाचा बांधला पाळणा जोजविते अंगाई
धन्य जाहली धरती भोळी तुझी मराठी आई
स्वातंत्र्याचें बाळरूप हें कुशींत संगोपाया
जय जय जय शिवराया ॥ ३ ॥

मुर्दाडा रणमर्द बनविले अंगि बाणलें त्राण
मावळच्या मातींत राजया तुवां ओतिलें प्राण
तुवां पसरली चैतन्याची विश्वमोहिनी माया
जय जय जय शिवराया ॥ ४ ॥

तोरण बांधी तो रणगाजी रणमस्ताची बोटें
चिरली पापी परवशतेची वाघनखांनीं पोटें
~~नरसिंव्हापरि हिरण्यकशी— अफझुल्ल्याची काया~~ -
जय जय जय शिवराया ॥ ५ ॥

कोंडाण्याचें लगीन लावी हिरडसचा तो तान्हा
हात जयाचा अमर जाहला शत्रूशी लढतांना
त्या हातांतिल स्वातंत्र्याचा ध्वज लागे फडकाया
जय जय जय शिवराया ॥ ६ ॥

गरुडझेप ही तुझी पाहता दिल्लीपति हादरला
~~दहशत घे ' शैतान सिवाजी या अल्ला या अल्ला !'~~
गनिमी कावा वर उलटावा बघतां तुज कवळाया
जय जय जय शिवराया ॥ ७ ॥

उभा रायगड अभिमानानें उंच उभारुनि माथा
कडेपठारी ती दुमदुमते स्वातंत्र्याची गाथा
दगडा दगडां फुटल्या जिव्हा तुझा पराक्रम गाया
जय जय जय शिवराया ॥ ८ ॥

तूंच प्राण अभिमान आमुचा युगपुरुषा शिवराया
सहस्त्र कंठांतुनी प्रभु हे शिवमंगल तुज गाया
' महाराष्ट्र ' जाहले आज हें तुझ्या कृपेची छाया
जय जय जय शिवराया ॥ ९ ॥

३३–१२–७०

राजा बढे

फेमस प्रिंटर्स–मुंबई ४

## दे मला गे चंद्रिके –

दे मला गे चंद्रिके प्रीती तुझी
रानहरिणी दे गडे भीती तुझी
मोहगंधा पारिजाता रे सख्या
हासशी कोमेजतां रीती तुझी
रे कलंका छेदिता तुज जीवनी
सुस्वरे जन गाइते गीती तुझी
सोशितोसी झीज कैसी चंदना
अपकारितां उपकार ही नीती तुझी

\+ \+ \+

मुंबई
२९-१-५२

# कां दयाळा अंत माझा पाहसी !

कां दयाळा अंत माझा पाहसी
ये उडोनी राजहंसा मानसीं
दूरदेशीं गुंतला माझा धनी
शोधिते ग त्या विहंगाला वनीं
मारिला की तीर कोणी फेकुनी
भंगलें काळीज रायाचें कुणी
या वियोगीं ही झुरे संयोगिता
कावे यावा योग राया भेटसी
घे मला पंखांत माझ्या पारवा
प्रीतिची ती ऊब सेवूं दे कुशीं

मुंबई -
१९४६

# तीर हे तेढे तुझे

लागती हे काळजाला तीर हे तेढे तुझे
आवळाया कंठ माझा नागिणी वेढे तुझे
बाई ग पुसता पुसेना आक ही गालावरी
काय ही किमया कळेना वाटते लाली तरी
सोडवीताही सुटेना लाजरे कोडे तुझे
भावभानींचे कोवळे की पारिजाताची फुले
नाचता अेलानथाते मखमली ही पावले
चालु दे हृदयावरी या कथ्थकी तोडे तुझे
भीतिनें लपलीस हरिणी काय चंद्राच्या उरी
'जिंका मला, जिंका मला' हो मीन आता भूवरी
वेड लावी चांदण्याचे गीत हें वेडे तुझे.

× × ×

मुंबई
२३.५.५१
बुधवार

# बेडात काय गोडी

कोणा कशी कळावी बेडात काय गोडी
ती प्रेममूढतेची सुरती न गूढ कोडी
सोडून नाव गावा
शोधावया विसावा
तुडवीत कंटकाची ती वाट नागमोडी
लहरीवरी फिरावे
जाळें घेत हेलकावे
जाणोनि लोटिली मी या वादळात होडी
दिसती अजाण भोळे
परि हे फितूर डोळे
माझ्या मनोगताची करितील ग चहाडी
हसले कुणी हसू दे
रुसले कुणी रुसू दे
राही कबूतरांची दारा घरात जोडी

मुंबई }
१९४१ }

\+ \+ \+

# चांदणे शिंपीत जाशी

चांदणे शिंपीत जाशी चालतां तूं चंचले
ओंजळीं उधळीत मोतीं हासरी ताराफुलें
वाहती आकाशगंगा कीं कटीची मेखला
तेजपुंजाची झळाळी तार पदरा गुंफिले
गुंतलेले जीव हे मंजीर कीं पायीं तुझ्या
जे तुझ्या तालावरी बोलावरी नादावले
गे निळावंती कशाला झाकशी काया तुझी!
पाहुं दे मेघाविना सौंदर्य तुझें मोकळे.

\+ \+ \+

मुंबई
शनिवार १९-३-५२

प्रेम केलें काय हा झाला गुन्हा
अंतरीची भावना सांगू कुणा
भोगिली शिक्षा पुरी मी प्रीतिची
साहवेना ती सुखाची वेदना
साक्ष द्याया बोलके झाले मुके
जीभ-चाऊनी टळे का वंचना !
रंगवीते चित्रलेखा प्रेमला
स्वप्नेंच्या कीं त्या उषेच्या मीलना
बोलुनी केलीस हो जाहीर चोरी
हासशी का रे गुन्हेगारा पुन्हां

मुंबई
१९४१

हासतांच नार ती अनार मस्करी उले
पारिजात लाजती मनांत जाइची फुलें
ऐकुं येइ गीतिका सुरासुरांत ओवली
नार कांपिला उरी नि झार पैंजणांतली
कोवळ्या फुलावरून टाकि मंद पाउलें
नाचती उरावरी तरी चकोर मंडळें
सोडिलेस भोवताल धीट नैन पारवे
तुझ्या अजाण प्रीतिचे कुरंग खेळती सवें
रान मोकळें तुला दबा धरून घ्या उडी
वेढण्यास सावजास कोवळे सवंगडी
येत कोण ते पहा हळूंच चोरपावलीं
जपून हालचाल हो हले तशीच सावली
नीर हालुनी सुटे अधीर झेप टाकली
कळे न सावजास ही कुणी शिकार साधली
या जिवास जिंकिलें
अनार मस्करी उले

मुंबई
३१-४-४८
शुक्रवार

कधीं भेटेन वनवासी वियोगी रामचंद्राला
मला ते पाय अंतरले, कुळाला काळिमा आला
कशी राहील कांतारीं विरागी जानकी राणी
तिच्या वाटेवरी जातां फुलांनो पायघड्या घाला
कसा पोटीं तुझ्या आलो अहाहा कैकयी माये
नव्हे तूं माउली माझी तुवां वधिलेस ताताला
नसे हो हाव राज्याची जिवींच्या जीवना रामा
पुरे वनवास हा आतां मिठी घालीन पायाला
तुम्ही सांगा अहो वहिनी तुम्हाला आण भरताची
नका भावावरी कोपूं चला रामा अयोध्येला

\+ \+ \+

मुंबई
२ नोव्हेंबर ५१
[illegible]

त्या चित्तचोरट्याला का आपुलें म्हणूं मी
स्मृतिजाल आसवांचे, दिनरात का विणूं मी
सहजीं करीं धरावें, नख लाउनी खुडावें
कीं फूल मालतीचें बागेतलें जणूं मी
नजरेत नीट आलें मी घेतलें निशाण
हलतांच पापणीचा हुकला अमोघ बाण
तें मीनकेतनाचें - ग मोडिलें धनू मी
आलें मनांत माझ्या किती सावसूद बाई
मी पाहिलें तरीही, तें पाहणार नाहीं
सौंदर्य हें कसें ग हृदयांत या चिणूं मी
माझ्या जिवा विसावा, गेला उडोनि रावा
राजीवलोचनाला ग वाहिली तनू मी

\+ \+ \+

मुंबई.

# हिरवा चाफा खुडला ग

कुणि ग बाई चोरुनि माझा हिरवा चाफा खुडला ग
उले न बाई ओठपाकळी बोल जिभेवर अडला ग

उपवनांत या पाउल वळलं
मोहर बघुनी मन हें चळलं
नांवहि कळलं, गांवहि कळलं जीव तयावर जडला ग
चाळविता कुतुहलें रेशमी मोहबंधनी पडला ग

भिवयाच्या खेचल्या कमानी
मिटुनी अर्धी नयन पापणी
जहर माखला तीर काजळी नजरेवरती चढला ग
मुकाच माझ्या मनचा रावा चतुराईनं लढला ग

परि बाई ग डाव उलटला
खेळाचा या रंग पलटला
संकोचाचा ससा अचानक हातामधुनी सुटला ग
मदनाचा संदेश पारवा मनांत माझ्या दडला ग

— x —

मुंबई

सांगू कशी ग मनाची व्यथा ही
पायदळीं कुस्करिल्या या फुलांची कथा ही
फुलली कलिका प्रणया येउ मनीं भरती
पडतां दवबिंदु पुरे, देठ, पाकळीवरती
उरे एकली ग जुईची लता ही
मातींत मिळोनीहि तुझा गंध दरवळे
झुलवाया तुज वारा ग वळवि पाउलें
तुझ्या जीविता रे पाळणा रिता ही
प्रीति फुला बकुळा रे नच पुरता फुलतासी
रंगविल्या आठवणी आसवांत उरलासी
जळे जीवनीं या फुलांची चिता ही

\+ + +

मंगळ
३०-९-५९.

हे मरणा गे चांदिके प्रीती तुझी
रानहरिणी देखणे भीती तुझी
मोहगंधा पारिजाता रे सख्या
कोमेजणारी हासरी रीती तुझी
रे कलंका छोडिला तुं जीवनी
भारते स्वरसंगती गीती तुझी
सोशितोसी झीज कैसी चंदना
अपकारिता उपकार ही नीती तुझी

पाखरे

२९-१-५२.

माझिया माहेरा जा रे पारवरा
माझिया माहेरा जा

ते तुझ्या सोबतीला आतुरलें माझें मन
वाट दाखवाया नीट माझी वेडी आठवण
मायेची माऊली सांजची साऊली
माझा ग भाईराजा –

माझ्या रे भावाची उंच हवेली
वहिनी माझी नवीनवेली
भोळ्या रे सांबाची भोळी गिरिजा

अंगणांत पारिजात तिथं ध्या हो ध्या विसावा
दरवळे बाई गंध चोहिकडे गांवोगावा
हळूच उतरा खाली फुलं नाजूक मोलाची
माझ्या मायमाऊलीच्या काळजाच्या कीं तोलाची
तुझी ग साळुंकी आहे बाई सुखी
सांगा पारवरांनो तिचीये कानीं एवढा निरोप माझा
माझिया माहेरा जा



राजाभाऊ वढे यांच्या एकूण कवितांचा विचार केला तर त्यांच्यात दोन प्रवाह प्रामुख्याने दृष्टीस पडतात. एक प्रवाह श्रृंगाराचा आणि दुसरा हास्याचा. या दोन रसाशिवाय तिसऱ्या रसाला त्यांच्या कवितेत स्थान नाही...

वढ्यांच्या बहुतेक कवितांचे स्वरूप भाव-गीतात्मक आहे. भावगीत हा शब्द रूढ झाला असला तरी तो अन्वर्थक नाही. कारण त्या नावात 'काव्य' हा मुख्य शब्द लुप्त झाला आहे आणि 'भाव' हा शब्द गीताचे विशेषण झाले असून काव्याऐवजी गीतालाच महत्त्व आले आहे. त्यांनी पुष्कळ गीतें रचली आहेत....

विडंबन काव्य हाही विनोदाचा एक प्रकार आहे. वढ्यांनी अशी विडंबन काव्ये बरीच लिहिली आहेत. मात्र वढ्यांनी विडंबनाची टूम केशवकुमारांकडून न उचलता ती बोवडे व उपाध्ये यांच्याकडून घेतली असावी.

राजाभाऊ नीलकंठ वढे यांचे 'कविमन' जात्याच निरभिमानी व निर्मळ आहे. त्यांच्या 'जागिये रघुनाथ कुंवर' या श्री गोस्वामी तुलसीदासजीच्या 'प्रभातीचे' 'जाग जाग रघुनंदन' हे मराठीकरण आणि उत्तर रामातील 'लव आणि कुश' इत्यादि अनेक भावपूर्ण गीतांचा समावेश या संग्रहात नाही. त्यांच्या मुखाने मी त्यांच्या कविता ऐकल्या होत्या. त्यांनी प्रदीर्घ काळ अगदी निष्कामपणे श्री महाराष्ट्र शारदेची पूजा बांधली आहे. ती त्यांना योग्य काळी योग्य फल दिल्याशिवाय राहणार नाही अशी माझी श्रद्धा आहे.

**प्रा. भवानीशंकर पंडित**

# शिवमंगल (स्तोत्र)

**दख्खनच्या हे प्रतापसूर्या**
**जय जय जय शिवराया**

मायभूमिच्या महन्मंगला, महाराष्ट्राच्या कलिजा
रायगडाच्या राजा देवा सह्याद्रीच्या सरजा
शिवनेरीच्या शिवा जिवाची कुरवंडी तव पाया
जय जय जय शिवराया ॥ १ ॥

दिशांदिशांतुनि आज तुझ्यावर तेजाची झिरपणी
नभोदुंदुभी झडती आली ही मंगल पर्वणी
तरंग गाती पुरुषसूक्त हे, लोळण घेई दर्या
जय जय जय शिवराया ॥ २ ॥

हृदयाचा बांधला पाळणा जोजविते अंगाई
धन्य जाहली धरती भोळी तुझी मराठी आई
स्वातंत्र्याचें बाळरूप हें कुशींत संगोपाया
जय जय जय शिवराया ॥ ३ ॥

मुर्दाडा रणमर्द बनविले अंगि बाणलें त्राण
मावळच्या मातींत राजया तुवां ओतिलें प्राण
तुवां पसरली चैतन्याची विश्वमोहिनी माया
जय जय जय शिवराया ॥ ४ ॥

तोरण बांधी तो रणगाजी रणमल्लाची बोटें
चिरली पापी परवशलेखी वाघनखांनीं पोटें
नरसिंव्हापरि हिरण्यकशी अफझुल्ल्याची काया
जय जय जय शिवराया ॥ ५ ॥

कोंडाण्याचें लगीन लावी हिरडसचा तो तान्हा
हात जयाचा अमर जाहला शत्रूशीं लढतांना
त्या हातांतिल स्वातंत्र्याचा ध्वज लागे फडकाया
जय जय जय शिवराया ॥ ६ ॥

गरुडझेप ही तुझी पाहता दिल्लीपति हादरला
दहशत घे 'शैतान शिवाजी या अल्ला या अल्ला!'
गनिमी कावा वर उलटावा बघतां तुज कवळाया
जय जय जय शिवराया ॥ ७ ॥

उभा रायगड अभिमानानें उंच उभारुनि माथा
कडेपठारी ती दुमदुमते स्वातंत्र्याची गाथा
दगडा दगडां फुटल्या जिव्हा तुझा पराक्रम गाया
जय जय जय शिवराया ॥ ८ ॥

तूंच प्राण अभिमान आमुचा युगपुरुषा शिवराया
सहस्र कंठांतुनी प्रभु हे शिवमंगल तुज गाया
'महाराष्ट्र' जाहले आज हें तुझ्या कृपेची छाया
जय जय जय शिवराया ॥ ९ ॥

२३-१२-७०

राजा

फेमस प्रिंटर्स–मुंबई ४

# थांब रे पथिका जरा

थांब रे पथिका जरा जा ऐकुनी माझी कथा
नीट घे पाहोनिया नांवाजल्या प्रीति पथा
वाकडी वळणेच ही कळणे कशी कोणासही
वाट ही चुकली तुझी मुरडून मागे पाहता
दिसाति तुज वाटेवरी या उमटली ही पाउलें
चुरली किती पायातळीं हृदयें तयानें चालता
काजळांतुनि वाहिली गुपितेंच कीं गालावरी
पुसली न कोणि आसवें कोणा न कळली रे व्यथा
उरले ना रसमाधुरी गळल्या पहा रे पाकळ्या
या पुन्हां सुकल्या फुला येईल कां हो हासता
यौवना कां पाडिशी रे मोहजाली जीवना
गौडिलें मन हें रंगारवाली तुझ्या रे मन्मथा

१५-८-५१
गुरुवार

— x —

# त्या चित्तचोरट्याला —

त्या चित्तचोरट्याला का आपुलें म्हणूं मी
स्मृतिजाळ आसवांचे दिनरात का विणूं मी
सहजीं करीं धरावे, नख लाउनी खुडावे
कीं फूल मालतीचें बागेतलें जणूं मी
नजरेंत नीट आलें मी घेतलें निशाण
हलतांच पापणीचा, सुटला अमोघ बाण
हें मीनकेतनाचें ग मोडिलें धनू मी
आलें मनांत माझ्या, किति साळसूद बाई
मी पाहिलें तरिही, ते पाहणार नाहीं
सौंदर्य हे कसें ग हृदयांत या चिणूं मी
माझ्या जिवा विसावा, गेला उठोनि रावा
राजीव लोचनाचा ग नाहिली तनू मी

पृन २

# काय हा झाला गुन्हा

Filmklasiks

प्रेम केले काय हा झाला गुन्हा
अंतरीची भावना सांगू कुणा
भोगिली शिक्षा पुरी मी प्रीतिची
साहवेना ही सुखाची वेदना
साक्ष द्याया बोलके झाले मुके
जीभ चाऊनी टळे का वंचना
रंगवीते चित्रलेखा प्रेमळा
स्वप्नींच्या की त्या उषेच्या मीलना
बोलुनी केलीस ही जाहीर चोरी
हांसशी का रे गुन्हेगारा पुन्हा

मुंबई १९४१

# कधीं भेटेन वनवासी

कधीं भेटेन वनवासी वियोगी रामचंद्राला
मला हे पाप अंतरले कुळाला काळिमा आला
कधी राहील कांतारी वियोगी जानकी राणी
तिच्या वाटेवरी जातां फुलांनी पाकळ्या घाला
क्षमा पोटीं तुझ्या आले अहाहा कैकयी माये
नव्हे तू माउली माझी तुवां वधिलेस ताताला
नसे हो हाव राज्याची जिवींच्या जीवना रामा
पुरे वनवास हा आता मिठी घालीन पायाला
तुम्ही सांगा अहो वहिनी तुम्हाला आण भरताची
नका भावावरी कोपूं चला रामा अयोध्येला

मुंबई
3 जानेवारी ५१
बुधवार

## तुटले रे अंतर हे : — —

तुटले रे अंतर हे सांग तरी जाऊं कुठे !
हात दिले रे हातीं, सावरितां तोल सुटे
सोनेरी सावलीत सुकते आधारलता
होइल कधि फुलवेली - अंतरिची आस मिटे
रंग भरो संसारीं स्वरशारिता सारंगी
साज बोलतो न आज कां मधेच तार तुटे
जवळि असुनि दूर दूर ऐलतीर पैलतीर
तरताही वादळात नौकेचा ऊर फुटे
तुजविण रे मज आता कोण दुजा सावरिता !
असुनि नाथ मी अनाथ, प्रीतीची हौस फिटे

मुंबई :- *
८-४-५३ }
मंगळवार }

[ सोनेरी सावली ]

# चांदणें शिंपीत जाशी

चांदणें शिंपीत जाशी चालतां तूं चंचळे
ओंजळी उधळीत मोतीं हांसरी ताराफुलें
वाहती आकाशगंगा कीं कटीची मेखला
तेजपुंजाची झळाळी तारपदरा गुंफिले
गुंजतीसे गीत हे मंजीर कीं पायीं तुझ्या
जे तुझ्या तालावरी बोलावरी नादावले
गे निळावंती कशाला झांकसी काया तुझी
पाहुं दे मेघाविना सौंदर्य तुझें मोकळें

[illegible]
२-३-५२

# दे मला गे चंद्रिके प्रीती तुझी

दे मला गे चंद्रिके प्रीती तुझी
रानहरिणी दे गडे भीती तुझी
मोहगंधा पारिजाता रे सख्या
हासडी कोमेजतां रीती तुझी
रे कळ्का छेदिता तुज जीवनीं
सुस्वरें जन भारिते गीती तुझी
सोशितोसी झीज कैसी चंदना
अपकारिता उपकार ही नीती तुझी

मुंबई
२९-१-५२

# काय कोणी पाहिलें —

मोहनी घालून मातें मोहनानें मोहिलें
मी न माझें मालकी माझी नसे देहावरी
पुष्प त्याला वाहिले निर्माल्य हातीं राहिलें
लूट केली संपदेची लाज सारीं सोडुनी
जप्त झाली मालमत्ता कर्ज रोखे फाडले
एकतारी मोडकी खाली भ्रमाचा भोपळा
भंगल्या ताना जुळोनी गीत वेडे गायिलें
वस्तुवाचुनीच छाया काय येथें व्यापली
सांपडेना तूं कुणाला शोधता भांबावले
जीवनीं अन्नावरी हा पिंड ज्यानें पोसला
घावया ज्याच्या तयाला मानसीं संकोचले
निंदका! नैवेद्य देवाकारणीं जो राखला
तोंड लाऊनी कसे रे पान तें उष्टावलें
डोळे फोडून केली नष्ट दृष्टी पातकी
नेमके घावावरी या कावळ्यांनी टोचले
काय पर्वा या जगाची स्वार्थ पोटीं ज्यास्त्रिय
नाचती बोलात वेडे, काय कोणी पाहिले

नागपूर
१५।३३

# યશવંત પ્રશસ્તિ

૧

સંગરાત રણચાતુરી, અસો સૈન્ય ચતુરંગ
બાહુબલી ચવ્હાણ હો રણગાજી રણરંગ

૨

માનદંડ મોડાવયા માનવ દે આવ્હાન
સ્વીકારી રણમર્દ હા ધીર-વીર ચવ્હાણ

૩

માનદંડ રાખવાવયા ફુલવા રક્તવસંત
રણનીતી યશવંત હો સમરી વ્હા જયવંત

૪

મહારાષ્ટ્રાચા હા અભિમાન । લાવિલ શિરવરી રાષ્ટ્રનિશાણ
સમરધુરંધર વ્હા ચવ્હાણ । ઉડવા અરિચી દાણાદાણ

૫

બિનીવરી ઝેપાવલા સહ્યાદ્રીચા હા સરજા
સંરક્ષક રણકેસરી યશવન્તાચા જયગર્જા

૬

ગાજવે યશવંતી તરવાર । સહ્યાદ્રીચા હા નિર્ધાર,
છત્રપતીંચા હા સરદાર । હિમાલયાચા રાખણહાર,

૭

એક જાહલે ભારતી અવઘે તાંદુળતીળ
મંત્રાક્ષરે પળવીલ હા તી પિવળી કાવીળ

૮

ચતુર ધોરણી મન ખંબીર । નિધે મરાઠા હા રણધીર
સિંહગર્જના ઘનગંભીર । પળતી તે પિવળે ઉંદીર,

૯

વાટ બંદ હી આપુઢે ઉતરા આતાં ઘાટ
તિબેટ સોડુનિ જા નિઘા વિસરા પાટાઘાટ.

૧૦

ફોડિલ તોફા ધડાધડા । વાજવા વાજત રાહુયવડા
પ્રાણ પણાનેં રક્ષિલ હા । સ્વાતંત્ર્યાચ્યા રાયગડા

૧૧

ભારત ગૌરવ એકચ ધ્યાસ । પટ્ટીં વાહિલે વય પન્નાસ
વાઢ દિવસ દાવીત જાનારા । કતૃત્વાચા તવ ઇતિહાસ

૧૨

ઘેઉલ કધીં ન તો માઘાર । સંરક્ષક હા સેનાભાર
કતૃત્વાચા કર્ણધાર । હોવો ગુણાચા જયજયકાર

રાજા બઢે